**राज्यातील मत्स्य उत्पादनात वाढ करण्यासाठी पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन करण्याबाबत धोरण.**

## महाराष्ट्र शासन

## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

## शासन शुध्दीपत्रक क्र. मत्स्यवि-२०१६/प्र.क्र.९८/पदुम-१३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०९ मार्च, २०१८

**वाचा -**

शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.मत्स्यवि-२०१६/ प्र.क्र.९८ / पदुम-१३, दि.१७.१०.२०१६.

**शासन शुद्धीपत्रक -**

शासन निर्णय दिनांक १७/१०/२०१६ मधील अ.क्र. १ मधील परिच्छेद-१ मध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात यावा.

(१) २०० हेक्टर खालील परंतू १५ हेक्टर पेक्षा कमी नसलेल्या व किमान १० मिटर खोली असलेल्या जलाशयात पिंजरा मत्स्यसंवर्धन करण्याची परवानगी देण्यात येईल. सदरच्या जलाशयाचा पाणी पुरवठा योजनेत समावेश नसावा.

(२) जलाशयाचे जलक्षेत्र, खोली व पाण्याचा वापर इत्यादी बाबतची तांत्रिक तपासणी संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी करुन त्याप्रमाणे जलाशयाची तांत्रिक योग्यता तपासून अहवाल मुख्यालयात सादर केल्यानंतर सदर जलाशयात पिंजरा प्रकल्पासाठी मान्यता देण्यात येईल. वेळोवेळी ठेका किंमत ठरविण्याचे व त्यात वाढ करण्याचा अधिकार आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे अध्यक्षतेखाली समितीस राहिल.

(३) ०.५ टक्के क्षेत्र पिंजरा प्रकल्पासाठी ठेक्याने देण्यासाठी आकारण्यात येणारी न्युनतम ठेका रक्कम ७५० चौ.मि. क्षेत्रात पिंजरा बांधकामासाठी लागणाऱ्या जलक्षेत्राची किंमत प्रथमवर्ष रु. २५,०००/- इतकी राहील.

**अ.क्र. २ मध्ये खालील बाबींचा समावेश करावा.**

इच्छूक मत्स्यसंवर्धकांना जलाशयाच्या ०.५ टक्के क्षेत्र पिंजरा प्रकल्पासाठी देण्यात येईल व प्रति प्रकल्पधारास ७५० चौ.मि. क्षेत्राच्या मर्यादेत जास्तीत जास्त २४ पिंजरा प्रकल्पासाठी (६X४x४ मीटर आकराचे) परवानगी देण्यात येईल.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०३०९११५७५५५७०१ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Vijay K. Chaudhari
Date: 2018.03.09 11:58:52 +05'30'

**( विजय चौधरी )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

(१) मा.राज्यपाल यांचे सचिव
(२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
(३) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(४) मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा/विधान परिषद यांचे खाजगी सचिव
(५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
(६) अप्पर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई-३२
(७) प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई-३२
(८) प्रधान सचिव (वने), मंत्रालय, मुंबई-३२
(९) प्रधान सचिव (ग्रामविकास), मंत्रालय, मुंबई-३२
(१०) सचिव (सहकार), मंत्रालय, मुंबई-३२
(११) प्रधान सचिव (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई-३२
(१२) प्रधान सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई-३२
(१३) सचिव, (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई-३२
(१४) सचिव (लक्षेवि), मंत्रालय, मुंबई-३२
(१५) आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
(१६) आयुक्त सहकार, पुणे
(१७) सर्व विभागीय आयुक्त
(१८) सर्व जिल्हाधिकारी
(१९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
(२०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मुंबई

(२१) सर्व आयुक्त, महानगरपालिका

(२२) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णाखोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, पुणे

(२३) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद

(२४) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

(२५) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव

(२६) कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे

(२७) सर्व प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय

(२८) सर्व विभागीय सहआयुक्त निबंधक सहकारी संस्था

(२९) उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य), आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय, मुंबई

(३०) सर्व सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय

(३१) सर्व जिल्हा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध)

(३२) महालेखापाल (लेखापरिक्षक/लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर

(३३) वित्त विभाग, (व्यय-२), मंत्रालय, मुंबई-३२.

(३४) सर्व कृषि व पदुम विभागातील कार्यासने/निवडनस्ती.